# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या चौतिसाव्या सभेचा कार्यवृत्तांत
## गुरुवार, दि.१९ मे, २०११ दुपारी २:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची चौतिसावी सभा गुरुवार, दि.१९/०५/२०११ रोजी दुपारी २:०० वा.** व्यवस्थापन परिषद कक्षात मा. कुलगुरू महोदय यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सभेस खालीलप्रमाणे सदस्य उपस्थित होते.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | मा. प्रा. डॉ. बंडगर बी. पी. - कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. सूर्यवंशी ए. बी. | सदस्य |
| ३) | प्रा. डॉ. पाटील टी. आर. | सदस्य |
| ४) | डॉ. लोणीकर एस. व्ही. | सदस्य |
| ५) | प्राचार्य डॉ. गणगे के. एन. | सदस्य |
| ६) | डॉ. सूर्यवंशी एस. एस. | सदस्य |
| ७) | ॲड. श्री. सलगर बी. एस. | सदस्य |
| ८) | डॉ. कदम एस. डी. | सदस्य |
| ९) | डॉ. शेख ए. ए. | सदस्य |
| १०) | श्री. गायकवाड बी. आर. | सदस्य |
| ११) | डॉ. साळुंखे डी. जे. परीक्षा नियंत्रक | कायम निमंत्रित |
| १२) | डॉ. पुजारी डी. डी. वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| १३) | कॅप्टन डॉ. सोनजे एन. पी. कुलसचिव | सचिव |

**अनुपस्थिती :**

व्यवस्थापन परिषदेच्या या सभेस प्राचार्य डॉ. भांजे बी. एम., प्राचार्य श्री. पवार एस. के. यांनी पत्राद्वारे, प्राचार्य डॉ. शेंडगे आर. एन., डॉ. श्रीमती याजमान्य एस. आर., डॉ. शिळीमकर टी. एन. व डॉ. कदम बी. बी. यांनी दूरध्वनीद्वारे या सभेस अनुपस्थित रहाणार असल्याचे कळविले. याची नोंद घेण्यात आली.

**स्वागतः**

मा.कुलसचिवांनी सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**सदर सभेत खालील प्रमाणे कामकाज झाले.**

**[ १ ]** **दि.२९ एप्रिल, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.**

ठराव : **दि.२९ एप्रिल, २०११ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला व कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ २ ]** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार व्यवस्थापन परिषदेस मा.कुलगुरु यांनी सादर करावयाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.**

महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करणे आवश्यक आहे. त्यानुसार मा.कुलगुरु यांचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर.

**ठराव :** **महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८ (x) नुसार मा.कुलगुरु यांनी सादर केलेल्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

**[ ०३ ]** **विद्यापीठाकडील प्रशासकीय कर्मचा-यांना पदोन्नती देण्याबाबत गठीत केलेल्या समितीचा अहवालानुसार केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव.**

(टिपणी: विद्यापीठातील पदोन्नतीच्या वाटयातील रिक्त पदावर प्रशासकीय कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यासाठी नेमलेली समिती खालीलप्रमाणे होती.

१) मा. श्री. एन. बी. पवार, - अध्यक्ष
सदस्य, व्यवस्थापन परिषद.
२) मा.डॉ. सी. बी. कोळेकर, - सदस्य
सदस्य, व्यवस्थापन परिषद.
३) प्रा. डॉ. पी. जी. मोरे, - सदस्य
सदस्य, व्यवस्थापन परिषद.
४) कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे, - सदस्य सचिव
कुलसचिव

सदर समितीने दि.२६/०७/१० रोजीच्या बैठकीत खालीलप्रमाणे शिफारशी केलेल्या आहेत.

| अ.क्र. | कर्मचा-याचे नांव | कार्यरत पद | पदोन्नतीचे पद | कोणत्या प्रवर्गातून पदोन्नती दिली त्याचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १) | श्री.काळे एस. टी. | सहा.कक्ष अधिकारी | कक्ष अधिकारी | खुला |
| २) | श्री.कदम एल. एस. | व.लिपीक | सहा.कक्ष अधिकारी | खुला |

समितीच्या शिफारशीनुसार पात्र कर्मचा-यांना पदोन्नतीचे आदेश निर्गमित केलेले आहेत. सबब केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

**ठराव :** **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०४ ]** **राजर्षी शाहू महाराज पुरस्कार देणेसाठी शाहू शिक्षण संस्था, कल्याण या संस्थेकडून प्राप्त झालेला रु. १,००,०००/- (अक्षरी -एक लाख रु.) चा स्वेच्छानिधी (धनाकर्ष) स्विकारुन, मा. कुलगुरु महोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्यावतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(**टिपणी** - मा. सचिव शाहू शिक्षण संस्था (P), कल्याण, जि. ठाणे (बी.एड. महाविद्यालय) या संस्थेकडून रक्कम रु. १,००,०००/-(अक्षरी - एक लाख रुपये) इतका स्वेच्छानिधी (धनाकर्ष क्र. ६४०२६४ दि.२/५/२०११) सोलापूर विद्यापीठास प्राप्त झालेला आहे. सदर निधीतून महात्मा जोतिराव फुले, क्रांतीदेवी सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि शाहीर अण्णाभाऊ साठे अशा दृष्टया महामानवांच्या विचाराची बांधीलकी मानणा-या उपेक्षित वर्गातल्या विद्यार्थ्याला राजर्षी शाहू महाराज यांच्या नावाने दरवर्षी पुरस्कार देण्यात यावा अशी इच्छा व्यक्त केलेली आहे.

**सबब, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम २८(h) नुसार सदरची देणगी स्विकारण्याचे अधिकार व्यवस्थापन परिषदेला आहेत. सबब, मा. कुलगुरुंनी सदरची देणगी रु. १,००,०००/- महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम १४(७) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्यावतीने स्विकारल्याची बाब माहितीस्तव).**

**ठराव :** **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०५ ]** **श्री. साखरे विनायक काशिनाथ यांचे चेंजिस-इन-स्टाफची दिलेली मान्यता NB-III-D ची अट वगळून मान्यता संदर्भात केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी : श्री. साखरे विनायक काशिनाथ यांचा चेजिस-इन-स्टॉफ मान्यतेचा प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात आलेला होता प्रस्तुत प्रस्तावावर विद्यापीठ परिनियम तरतूदी अन्वये विहित (अधिकार मंडळाच्या मान्यतेने) कार्यवाही करुन या कार्यालयाचे पत्र क्र. SOL/UTY/BCUD/AP/१२९० Date: २०/०५/२०१० अन्वये चेंजिस-इन-स्टाफ समितीने संबंधीत अधिव्याख्यातांच्या नावासमोर NB-III-D ची अट घालून मान्यता दिलेली होती. श्री. साखरे विनायक काशिनाथ हे (लेक्चरर इन मॅथेमॅटीक्स) रयत शिक्षण संस्थेअंतर्गत मुंबई विद्यापीठ कार्याक्षेत्रात कार्यरत होते. त्यांची कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, पंढरपूर येथे बदली झाल्याने चेंजिस-इन-स्टाफ सादर करण्यात आला आहे. वास्तविक सदर अधिव्याख्याता यांची शैक्षणिक अर्हता पडताळून पाहता असे निर्दनास आले की त्यांची M.Phil पदवी सन १९९४ मधील असल्याने NB-III-D ची अट वगळून मान्यता दिली आहे सबब माहितीस्तव).

**ठराव :** **मा.कुलगुरुमहोदयांनी केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[ ०६ ] विद्यापीठाकडील प्रशासकीय कर्मचा-यांना पदोन्नती देण्याबाबत गठीत केलेल्या समितीची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

[टिपणीः विद्यापीठातील पदोन्नतीच्या वाटयातील रिक्त पदावर प्रशासकीय कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी पात्र/अपात्र ठरविण्यासाठी नेमलेली समिती खालीलप्रमाणे
१)प्रा.डॉ.एस.व्ही.लोणीकर सदस्य,व्यवस्थापन परिषद.
२)प्राचार्य डॉ.बी.एम. भांजे सदस्य,व्यवस्थापन परिषद.
३) डॉ.आर. बी. भोसले, सदस्य मागासवर्गीय प्रतिनधी व सचिव, विशेष कक्ष स्थायी समिती

समितीने खालीलप्रमाणे शिफारशी केलेल्या आहेत.

| अ. क्र. | कर्मचा-याचे नांव | कार्यरत पद | पदोन्नतीचे पद | कोणत्या प्रवर्गातून पदोन्नती दिली त्याचा प्रवर्ग |
|---|---|---|---|---|
| १) | श्री.वलेकर द.म. | सहा.कक्ष अधिकारी | कक्ष अधिकारी | खुला |
| २) | श्री.दीक्षीत पी.एस. | व.लिपीक | सहा.कक्ष अधिकारी | खुला |
| ३) | श्री.पाटील एम. ए. | व.लिपीक | सहा.कक्ष अधिकारी | खुला |
| ४) | श्री.चौधरी एस.बी. | व.लिपीक | सहा.कक्ष अधिकारी | विमुक्त जाती/ भटक्या जमाती |
| ५) | श्री.दिलपाके यु.जी. | क. लिपीक | व.लिपीक | अनुसूचित जाती |
| ६) | श्री.राक्षे यु.ए. | क. लिपीक | व.लिपीक | खुला |

या समितीच्या शिफारशीनुसार पात्र कर्मचा-यांना पदोन्नती देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव : विद्यापीठाकडील प्रशासकीय कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याबाबत गठीत केलेल्या समितीची शिफारस स्विकारुन मान्यता देण्यात आली.**

**[ ०७ ]   विद्यापीठाच्या संकुलातील अध्यापकांना सेवेत कायम करण्याची बाब  विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठाच्या संकुलातील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहाय्यक प्राध्यापक यांचा खालील दर्शविल्याप्रमाणे परिविक्षाधीन कालावधी पूर्ण झालेला आहे.

| अ. क्र. | अध्यापकांचे पूर्ण नाव | धारण केलेले पद | रुजू दिनांक | परिविक्षाधीन कालावधी संपलेला दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. एरन्ती अशोककुमार नागय्याशेटटी | प्राध्यापक | १४/१०/२००८ | १३/१०/२०१० |
| २ | डॉ. भोसले रघुनाथ भिकाजी | सहयोगी प्राध्यापक | १८/११/२००८ | १७/११/२०१० |
| ३ | डॉ. घुटे विकास भाऊराव | सहाय्यक प्राध्यापक | ०१/०१/२००९ | ३१/१२/२०१० |
| ४ | डॉ. लोंखंडे बाळकृष्ण जगन्नाथ | सहाय्यक प्राध्यापक | १८/१०/२००८ | १७/१०/२०१० |
| ५ | डॉ. चिंचोलकर रविंद्र भास्करराव | सहाय्यक प्राध्यापक | ०१/१०/२००८ | ३०/०९/२०१० |
| ६ | डॉ. श्रीमती पाटील माया जगदीश | सहाय्यक प्राध्यापक | २३/०९/२००८ | २२/०९/२०१० |
| ७ | श्री व्हनकडे प्रकाश गुरुमुर्ती | सहाय्यक प्राध्यापक | २१/१०/२००८ | २०/१०/२०१० |
| ८ | श्री. शंगृारे सदानंद नारायणराव | सहाय्यक प्राध्यापक | १९/११/२००८ | १८/११/२०१० |
| ९ | श्री. धुळप विनायक पोपट | सहाय्यक प्राध्यापक | २२/१०/२००८ | २१/१०/२०१० |
| १० | श्री. मेंते राजीवकुमार शिवशंकर | सहाय्यक प्राध्यापक | १६/०९/२००८ | १५/०९/२०१० |
| ११ | श्रीमती जैन रुपाली शिखरचंद | सहाय्यक प्राध्यापक | ०१/१०/२००८ | ३०/०९/२०१० |
| १२ | श्रीमती ठेंगे ज्योती धर्मराज | सहाय्यक प्राध्यापक | १९/०३/२००९ | १८/०३/२०११ |

परिनियम २७० (३) नुसार संचालक / विभागप्रमुख यांचेकडून परिविक्षाधीन कालावधित कार्यरत असलेल्या अध्यापकांना कायम करावे किंवा नाही याबाबत त्यांचे " Definite remarks and recommendation " मागविले होते. त्यावर सर्व संचालकांनी / विभागप्रमुखांनी त्यांना सेवेत कायम करावे अश्याप्रकारे गोपनिय पत्राव्दारे कळविले आहे.

तसेच परिनियम क्र. २७० अन्वये सहामाही गोपनिय अहवाल आणि परिनियम क्र.२७४ नुसार वार्षिक स्वंयमूल्यमापन अहवाल संकुलाच्या संचालकांनी पाठवून दिले असून ते मा. कुलगुरु यांनी पुनर्विलोकनही केले आहेत.

तरी विद्यापीठ संकुलातील अध्यापकांना वरीलप्रमाणे नमूद केल्यानुसार त्यांचा परिविक्षाधीन कालावधी संपलेल्या दिनांकापासून कायम करण्याची बाब विचारार्थ ).

**ठराव :   विद्यापीठाच्या संकुलातील अध्यापकांना सेवेत कायम करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ ०८ ]** **विद्यापीठ क्षेत्रातील विधी महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या वयाची असलेली अट लागू न करण्याबाबतची विद्यापरिषदेची शिफारस विचारार्थ.**

**(टिपणी -** विधी विद्याशाखांतर्गत Three Year LL.B. Course & Five Year B.A. LL.B. Course चा Bar Council of India Rules under Section 7(h) Advocates Act, 1961 नुसार विधी अभ्यासमंडळाने अभ्यासक्रम व प्रवेश घेण्याची वयाच्या अटीबाबतचा अध्यादेश क्र. १८ केलेला आहे. त्यास व्यवस्थापन परिषदेच्या दि.१२ जून, २००९ ठराव क्र. १५ अन्वये मान्यता देण्यात आली.

**O.21.3** - The maximum age for seeking admission into a stream of Integrated B.A., LL.B. Degree Course is limited to twenty years in case general category of applicants and twenty two years in case of applicants from SC, ST and other Backward Communities.

**O.22.3**- The maximum age for seeking admission into a stream of Three Year LL.B. Degree Course in Law is limited to thirty years in case of general category of applicants and thirty five years for the applicant belonging to SC or ST or any other Backward Community.

दि.२४/१२/२०१० रोजीच्या अधिसभेच्या बैठकीत ठराव क्र. ११- विद्यापीठ क्षेत्रातील विधी महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या वयाची असलेली अट लागू करु नये व कोणत्याही वयाच्या विद्यार्थ्याला विधी महाविद्यालयात प्रवेश देण्याची तरतूद करण्यात यावी अशी शिफारस ही अधिसभा विद्याशाखेस व व्यवस्थापन परिषदेस करीत आहे.

**ठराव :** " सदरचा ठराव एकमताने मान्य करण्यात आला. "

वरीलप्रमाणे अधिसभेची शिफारस दि. २६/०४/२०११ रोजीच्या विद्यापरिषद बैठकीत विषय क्र. ६३ अन्वये ठेवली असता, त्यावर खालीलप्रमाणे ठराव झाला.

**ठराव :** "विद्यापीठ क्षेत्रातील विधी महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या वयाची असलेली अट लागू करु नये व कोणत्याही वयाच्या विद्यार्थ्याला विधी महाविद्यालयात प्रवेश देण्याची तरतूद करण्यात यावी अशी अधिसभेची शिफारस स्विकारण्यात आली. तसेच विधीशाखा अध्यादेश क्र. १८ रद्द करण्याबाबत व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली."

**सबब, उक्त ठरावानुसार दंडक रद्द करण्याची शिफारस विचारार्थ).**

**ठराव :** **विद्यापीठ क्षेत्रातील विधी महाविद्यालयात प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या वयाची असलेली अट लागू न करण्याबाबतची विद्यापरिषदेची शिफारस स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**[ ०९ ] विद्यापीठ संकुलातील एम.कॉम. अभ्यासक्रमाचे शुल्क ठरविण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी : विविध अभ्यासक्रमाचे शुल्क ठरविण्यासाठी व्यवस्थापन परिषदेने समिती गठित केली आहे.

विद्यापीठामध्ये शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून एम.कॉम. हा अभ्यासक्रम सुरु होणार आहे. या अभ्यासक्रमासाठी शुल्क समितीने शिफारस केलेले शुल्क सोबत जोडले आहे.

सदरचे शुल्क हे सन २०१०-११ या शैक्षणिक वर्षापासून लागू करावयाचे असून यास मा.कुलगुरु यांनी विद्यापरिषदेच्या वतीने मान्यता दिली आहे.

विद्यापीठ संकुलातील एम.कॉम. अभ्यासक्रमाचे शुल्क ठरविण्याची बाब विचारार्थ).

**ठराव : विद्यापीठ संकुलातील एम. कॉम. अभ्यासक्रमाचे शुल्क समितीने शुल्काची शिफारस स्विकारण्यात येवून सदरचे शुल्क शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून लागू करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १० ] सोलापूर विद्यापीठ परिसरातील विविध इमारती तसेच सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र इमारतीच्या साफसफाई कामाबाबत निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेची बाब विचारार्थ.**

(टिपणीः वरील विषयांकित विद्यापीठ इमारतीच्या साफसफाई कामासंबंधी निविदा सूचना दि.२२/०४/२०११ रोजीच्या दै. संचार, एकमत या दैनिकांमधून देण्यात येवून अंतिम दि.०७/०५/२०११ पर्यंत निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

अंतिम दिनांकापर्यंत विद्यापीठ कार्यालयास पाच फर्मकडून निविदा प्राप्त झालेल्या आहेत. निविदा प्राप्त झालेल्या फर्मच्या प्रतिनिधीसोबत दि.०९ मे, २०११ रोजी दुपारी १२:०० वाजता वाटाघाटी करण्यात आल्या. त्याचा तक्ता सोबत जोडला आहे. त्यानुसार सर्वात कमी दर असलेले मे. भंडारी कन्स्ट्रक्शन ॲन्ड सर्व्हिसेस, सोलापूर यांचे रु.३२,५००/- प्रति महिना या दराने इमारत साफसफाईच्या कामास शिफारस करण्यात आली आहे.

सबब, विद्यापीठ इमारत साफसफाईचे काम मे. भंडारी कन्स्ट्रक्शन ॲन्ड सर्व्हिसेस, सोलापूर यांना रु.३२,५००/- प्रति महिना या दराने अकरा महिन्याच्या कालावधीसाठी देण्याबाबत विचारार्थ).

**ठराव : सोलापूर विद्यापीठ परिसरातील विविध इमारती तसेच सोलापूर शहरातील रंगभवन येथील अभ्यासकेंद्र इमारतीच्या साफसफाई कामाबाबत पुनश्चः निविदा मागवून प्रक्रिया करावी असे ठरले.**

**[ ११ ]** **संलग्नित महाविद्यालयातून विद्यापीठ निवड समिती मार्फत निवड झालेल्या व विद्यापीठ कार्यक्षेत्रात एका महाविद्यालयातून दुस-या महाविद्यालयात बदली होऊन व पदनाम बदलीसाठी कार्यालयास प्राप्त झालेल्या सोबतच्या तक्यातील शिक्षकांचे चेंजिंस इन स्टॉफच्या समितीने केलेल्या शिफारशी दंडक ६५ अन्वये विचारार्थ.**

(टिपणी:- महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग एक - मध्य उप - विभाग, उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांच्या दि. १८ ऑगस्ट २०१० रोजीच्या शासन निर्णयानुसार पहिल्या विविध प्राधिकरणाचा कार्यकाल दि.३१-०८-२०१० रोजी संपुष्टात आलेला आहे. चेंजिंस-इन-स्टाफ समिती दि. २८-०२-२०११ रोजी व्यवस्थापन परिषदेत तीन समिती सदस्यांची निवड झालेली आहे, तसेच दि. १५-०३-२०११ रोजी महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाकडून दोन समिती सदस्यांची निवड झालेली आहे अशी पाच सदस्यांची समिती गठीत झाली आहे.

संलग्नित महाविद्यालयाकडील शिक्षकांना चेंजिस इन स्टाफ मान्यता देण्यासाठी Ordinance ५९ प्रमाणे गठीत केलेल्या समितीची बैठक दि. ०८-०४-२०११, १८-०४-२०११ व २५-०४-२०११ रोजी झाली. प्रस्तुत बैठकीमध्ये सोबत जोडलेल्या तक्त्यांत शिक्षकांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे चेंजिस इन स्टाफच्या मान्यतेच्या शिफारशी केलेल्या आहेत. सदर शिफांरशींना Ordinance ६५ प्रमाणे व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. यास्तव चेंजिस इन स्टाफ समितीच्या शिफारशी विचारार्थ).

**ठराव :** **संलग्नित महाविद्यालयातून विद्यापीठ निवड समिती मार्फत निवड झालेल्या व विद्यापीठ कार्यक्षेत्रात एका महाविद्यालयातून दुस-या महाविद्यालयात बदली होऊन व पदनाम बदलीसाठी कार्यालयास प्राप्त झालेल्या शिक्षकांचे चेंजिंस इन स्टॉफच्या समितीने केलेल्या शिफारशी दंडक ६५ अन्वये खालील दुरुस्त्यांसह स्विकारण्यात येवून मान्यता देण्यात आली.**

**१) पान क्र. ५२ वरील डॉ. सूर्यवंशी चंद्रकांत श्रीपती यांचा रकाना क्र. ११ मधील शिक्षकांचा अनुभव "25 Years" ऐवजी "15 Years" अशी दुरुस्ती करावी.**

**२) पान क्र. ६६ वर, अ.क्र. १० मध्ये, "श्री. पाटील विनय अशोक" ऐवजी "श्रीमती पाटील विनया अशोक" अशी दुरुस्ती करावी.**

**[ १२ ]** **बांधकाम समितीवर (Buildings & Works Committee) व्यवस्थापन परिषद सदस्यांमधील एका सदस्याची व्यवस्थापन परिषद प्रतिनिधी म्हणून नामनिर्देशनाबाबत.**

(टिपणी : विद्यापीठ परिनियम क्र. S337 (iv) नुसार "Nominee of the Management Council to be nominated by the Management Council" असे व्यवस्थापन परिषदेचे प्रतिनिधी हे बांधकाम समितीवर सदस्य आहेत.

सबब, परिनियम क्र. S337 (iv) नुसार व्यवस्थापन परिषद प्रतिनिधी म्हणून बांधकाम समितीवर पाठविण्यासाठी सदस्यांचे नामनिर्देशन होण्याबाबत विचारार्थ).

**ठराव :** **बांधकाम समितीवर (Buildings & Works Committee) व्यवस्थापन परिषद सदस्यांमधून श्री. गायकवाड बी. आर. यांचे प्राचार्य डॉ. गणगे के. एन. यांनी नाव सुचविले व त्यास डॉ. कदम एस. डी. अनुमोदन दिले.**

**[ १३ ]** **मुलींचे वसतिगृह येथील मेस व डायनिंग हॉल इमारतीचे इलेक्ट्रीकल कामाचे निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेची बाब विचारार्थ.**

(**टिपणी-**:वरील विषयांकित मुलींचे वसतिगृह येथील मेस व डायनिंग हॉल इमारतीचे इलेक्ट्रीकल काम करणे कामाचे निविदा सुचना दि.२२.०४.२०११ रोजीच्या दै. लोकमत या दैनिकांमधून देण्यात येवून अंतिम दि.०३.०५.२०११ पर्यत निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

अंतिम दिनांकापर्यत विद्यापीठ कार्यालयास तीन फर्मकडून निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदा प्राप्त झालेल्या फर्मच्या प्रतिनिधीं सोबत दि. १२ मे, २०११ रोजी दुपारी ११.०० वाजता वाटाघाटी करण्यात आल्या. त्याचा तक्ता सोबत जोडला आहे. त्यानुसार सर्वात कमी दर असलेले मे.फिलिप ऐअर कंडिशन ॲन्ड रेफ्रिजरेटर वर्क्स, सोलापूर यांचे अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,४७,४०६/- पेक्षा १२% कमी दराने रु. १,२९,७१७/- या दराने इलेक्टिकलचे काम करण्यासाठी दि. १२.०५.२०११ रोजी झालेल्या बांधकाम समितीने व्यवस्थापन परिषदेस मान्यतेसाठी शिफारस केलेली आहे.

सबब मुलींचे वसतिगृह येथील मेस व डायनिंग हॉल इमारतीचे इलेक्ट्रीकलचे काम मे.फिलिप ऐअर कंडिशन ॲन्ड रेफ्रिजरेटर वर्क्स, सोलापूर यांचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,४७,४०६/- पेक्षा १२% कमी दराने रु. १,२९,७१७/- देणेबाबत विचारार्थ).

**ठराव :** **मुलींचे वसतिगृह येथील मेस व डायनिंग हॉल इमारतीचे इलेक्ट्रीकल कामाच्या निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेस व सदरचे काम मे. फिलिप ऐअर कंडिशन ॲन्ड रेफ्रिजरेटर वर्क्स, सोलापूर यांचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.१,४७,४०६/- पेक्षा १२% कमी दराने रु.१,२९,७१७/- या रकमेस देण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १४ ]** **विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात खोदलेल्या सी. सी. टी. समतल चरी भरण्याच्या कामाची निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेची बाब विचारार्थ.**

**(टिपणी-**:वरील विषयांकित विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात खोदलेल्या सी.सी.टी.समतल चरी कामाची निविदा सुचना दि. २२.०४.२०११ रोजीच्या दै. पुण्यनगरी या दैनिकांमधून देण्यात येवून अंतिम दि. ०३.५.२०११ पर्यत निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

अंतिम दिनांकापर्यत विद्यापीठ कार्यालयास तीन फर्मकडून निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदा प्राप्त झालेल्या फर्मच्या प्रतिनिधीं सोबत दि. ०३ मे, २०११ रोजी दुपारी १२.०० वाजता वाटाघाटी करण्यात आल्या. त्याचा तक्ता सोबत जोडला आहे. त्यानुसार सर्वात कमी दर असलेले श्री.शिवाजी वालचंद राठोड, सोलापूर यांचे प्रति रनिंग मीटर रु.२५/- या दराने वार्षिक दर करार करण्यास बांधकाम समितीने व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली आहे.

सबब विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात खोदलेल्या सी.सी.टी.समतल चरी भरण्याच्या कामाची श्री.शिवाजी वालचंद राठोड, सोलापूर यांचे प्रति रनिंग मीटर रु.२५/- या दराने वार्षिक दर करार करणेबाबत विचारार्थ].

**ठराव :** **विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरात खोदलेल्या सी.सी.टी.समतल चरी भरण्याच्या कामाची निविदा मागवून केलेल्या प्रक्रियेस व सदरचे काम श्री. शिवाजी वालचंद राठोड, सोलापूर यांचे प्रति रनिंग मीटर रु.२५/- या दराने वार्षिक दर करार करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[ १५ ]** **शै. वर्ष २०११-१२ पासून विद्यापीठात Master of Library Science & Information Science हा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचे ॲड. बसवराज सलगर यांचे पत्र विचारार्थ.**

(टिपणी: सोलापूर विद्यापीठाच्या पदवीधारकांना इतर विद्यापीठात प्रवेशासाठी २० टक्के जागा आरक्षित असल्याने अनेकांना Master of Library Science and Information Science या पदव्युत्तर अभ्यासक्रमापासून वंचित रहावे लागत आहे. यामुळे सोलापूर विद्यापीठात शै. वर्ष २०११-१२ पासून Master of Library Science and Information Science हा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. बसवराज सलगर यांनी सोबत जोडलेल्या पत्रानुसार विनंती केलेली आहे.

ॲड. बसवराज सलगर यांचे विद्यापीठात शै. वर्ष २०११-१२ पासून Master of Library Science & Information Science हा पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करावा अशी विनंती करणारे पत्र विचारार्थ).

**ठराव :** **सदरचा विषय अमान्य करण्यात आला.**

[ १६ ] **वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर या महाविद्यालयाने शै.वर्ष २००६-०७ पासून बी.ए भाग १ या अभ्यासक्रमाची अतिरीक्त तुकडी १ व शै.वर्ष २००८-०९ पासून बी.ए भाग १ अतिरीक्त तुकडी १ व बी.ए भाग २ या अभ्यासक्रमाची अतिरीक्त तुकडी १ व अतिरीक्त विद्यार्थी प्रवेश क्षमतेस विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण न घेता अतिरीक्त तुकडयां सुरु केल्यामुळे अतिरीक्त तुकडया व अतिरीक्त विद्यार्थी प्रवेशित केल्या संदर्भात विद्या परिषदेने केलेली शिफारस विचारार्थ.**

(टिपणी :- **विद्यापीठ संलग्नित महाविद्यालयांकडून महाविद्यालयात सुरु असलेल्या अभ्यासक्रमांच्या विद्यार्थी प्रवेश क्षमता व प्रत्यक्षात विद्यार्थी प्रवेशाबाबतची माहिती या कार्यालयाच्या पत्राव्दारे मागविण्यात आली होती.**

वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर यांच्या कडूनही उपरोक्त बाबत माहिती या कार्यालयाकडे प्राप्त झालेली आहे. वसुंधरा कला महाविद्यालय, सोलापूर यांना बी.ए भाग १ व २ या अभ्यासक्रमांच्या अतिरीक्त तुकडयांना खालील प्रमाणे कायम विना अनुदानित तत्वावर महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळाली आहे.

| अनु क्रं | अभ्यासक्रम | अतिरीक्त तुकडी मान्यता | सन | शासन पत्र क्रं |
|---|---|---|---|---|
| १ | बी.ए भाग १ | १ | २००६-०७ | अमवि २००६ / (११ / ०६ ) मशि - ३ दि. ०३.०६.२००६ |
| २ | बी.ए भाग १ व बी.ए भाग २ | १ | २००८-०९ | एजीसी २००८ / (२१५ / ०८) मशि - ३ दि. १९.०६.२००८ |

**उपरोक्त अभ्यासक्रमाच्या अतिरीक्त तुकडयांना महाराष्ट्र शासनाच्या मान्यतेच्या अनुषंगाने विद्यापीठाचे प्रथम संलग्निकरण महाविद्यालयाने करुन घेणे आवश्यक होते. तथापि महाविद्यालयाने याबाबत पूर्ण कार्यवाही केली नसल्याचे निदर्शनास आले असून सदर तुकडयांना विद्यापीठाचे संलग्निकरण घेतलेले नाही.**

**तथापि सन २००६-०७ पासनू महाविद्यालयाने विद्यापीठाचे संलग्निकरण - नसताना बी.ए भाग १ या अभ्यासक्रमाची अतिरीक्त तुकडी सुरु केलेली आहे व विद्यार्थी प्रवेशित केलेले आहेत व तसेच शै.वर्ष २००८-०९ पासून बी.ए भाग १ व २ या अभ्यासक्रमाच्या अतिरीक्त तुकडया सुरु केले असल्याचे व मान्य प्रवेश क्षमतेपेक्षा जादा विद्यार्थ्यांनाही आज अखेर प्रवेशित केलेले असल्याचे महाविद्यालयाकडून प्राप्त झालेल्या माहितीवरुन निदर्शनास आले आहे.**

**सदरचा विषय दि.२६.०४.२०११ रोजीच्या विद्या परिषदे समोर विषय क्रं २२० अन्वये सादर केला असता ठराव क्रं २२० नुसार खालील प्रमाणे ठराव झालेला आहे.**

"उपरोक्त संदर्भित नियमाप्रमाणे दंडाबाबतची योग्य ती कार्यवाही करुन सदर तुकड्यांना व अतिरिक्त विद्यार्थी प्रवेश क्षमतेस प्रथम संलग्निकरण देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली."

सबब विद्या परिषदेची शिफारस विचारार्थ).

**ठराव :** **सदरचा विषय पुनश्चः सादर करावा असे ठरले.**

**<u>मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय :</u>**

**[१७ (१)]  खरेदी समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेस्तव.**

(टिपणीः खरेदी समितीची सभा दि.०९/०५/२०११ रोजी सकाळी ११:३० वाजता झाली. या सभेचा कार्यवृत्तांत स्टॅट्यूट ३२४ नुसार वित्त व लेखा समितीच्या समितीच्या व व्यवस्थापन परिषदेच्या समोर मान्यतेसाठी ठेवणे आवश्यक आहे. त्यानुसार दि.०९/०५/२०११ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीत सदर कार्यवृत्तांत शिफारशीसाठी सादर केला होता.

खरेदी समितीच्या बैठकीतील ठराव क्र. ०६ बाबत, ओंकार एजन्सी, सोलापूर यांच्याकडून दरपत्रक मागविले आहे. ते सोबत जोडले आहे.

सबब, खरेदी समितीच्या दि.०९/०५/२०११ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृतांताबाबत वित्त व लेखा समितीने खालीलप्रमाणे ठराव केला आहे.

| | |
|---|---|
| **ठराव क्र. २ :** | **दि.०९/०५/२०११ च्या खरेदी समितीचा कार्यवृत्तांत मान्यतेसाठी सादर करण्यात आला असता श्री. तडकसे सतीश, सहसंचालक, लेखा व कोषागारे कार्यालय, पुणे यांनी उपस्थित केलेल्या आक्षेपामुळे खरेदी समितीचे ठराव क्र. ०२, ०४, ०५ व ०८ (०१) ते ०८ (०७) बाबत पुनश्चः निविदा प्रक्रिया करावी असे ठरले तसेच ठराव क्र. ०३ व ०६ बाबत खरेदीची व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.** |

सबब, खरेदी समितीच्या दि.०९/०५/२०११ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांताबाबत वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस विचारार्थ).

**ठराव :  खरेदी समितीच्या दि.०९/०५/२०११ रोजी झालेल्या बैठकीच्या कार्यवृत्तांताबाबत वित्त व लेखा समितीने केलेली शिफारस स्विकारण्यात येवून वित्त व लेखा समितीच्या शिफारशीनुसार कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.**

**[१७ (२)]** **आव्हान २०११ कार्यक्रमासाठी २००x१०० या आकाराचे मंडप उभारणी करणे कामाची निविदा मागवून केलेली कार्यवाही विचारार्थ.**

टिपणी : **आव्हान २०११** या कायक्रमासाठी २००x१०० या आकाराचे मंडप उभारणी करणे कामाची जाहीर निविदा सूचना दै.सकाळ दि.२९/०४/२०११ रोजी देण्यात आलेली होती. निविदा पोहोच करण्याची अंतिम तारीख दि.०७/०५/२०११ रोजी दु.१२.०० वाजेपर्यंत होती. त्यास अनुसरुन एकूण ०४ निविदा धारकांनी निविदा कार्यालयास प्राप्त झाल्या. त्यांनतर सदरच्या निविदा दि.०९/०५/२०११ रोजी दु.१.०० वाजता उघडण्यात येवून त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला. निविदेमधील निविदा धारकांनी भरलेले दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा खूपच जास्त असल्याने प्राप्त निविदा रद्द करण्यात आल्या. त्यानंतर दि.१२/०५/२०११ रोजीच्या दै. सकाळ या दैनिकामध्ये फेर जाहीर निविदा सूचना देण्यात आली. निविदा विद्यापीठ कार्यालयाकडे सादर करण्याची अंतिम तारीख दि.१९/०५/२०११ रोजी होती. त्यास अनुसरुन एकूण ०९ निविदा धारकांनी निविदा भरल्या होत्या. सोबत तुलनात्मक तक्ता जोडलेला आहे.

सबब **आव्हान २०११** या कार्यक्रमासाठी २००x१०० या आकाराचे मंडप उभारणी करणेचे काम मे. श्रवंती मंडप डेकोरेटर, सोलापूर यांना रु.९५,०००/-इतक्या दराने देण्याची बाब विचारार्थ).

**ठराव :** **आव्हान २०११ कार्यक्रमासाठी २००x१०० या आकाराचे मंडप उभारणी करण्याच्या कामाच्या निविदा मागवून केलेल्या कार्यवाहीस व सदरचे काम मे. श्रवंती मंडप डेकोरेटर, सोलापूर यांना रु.९५,०००/- इतक्या दरामध्ये करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**[१७ (३)]** **सोलापूर विद्यापीठा तर्फे आयोजित आव्हान २०११ या कार्यक्रमात सहभागी होणा-या अंदाजे १२०० स्वयंसेवक/स्वयसेविका/संघव्यवस्थापक व इतर मान्यवरांना भोजन पुरवठा करण्याची बाब विचारार्थ.**

(सोलापूर विद्यापीठातर्फे आयोजित आव्हान २०११ या कार्यक्रमात सहभागी होणा-या अंदाजे १२०० स्वयंसेवक/स्वयसेविका/संघव्यवस्थापक व इतर मान्यवरांना भोजन पुरवठा करण्यासाठी सोलापूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाने दि.२९/०४/२०११ रोजी वर्तमानपत्रातून जाहीर निविदा मागविल्या होत्या. सदर निविदा कार्यालयात जमा करण्याची अंतिम तारीख दि.०७/०५/२०११ दुपारी १२.०० वाजेपर्यंत होती. सदर मुदतीच्या आत एकूण सात भोजन पुरवठाधारकांनी निविदा जमा केल्या. सदर निविदा दि.०९.५.२०११ रोजी सकाळी ११.०० वाजता खरेदी समिती सदस्यांच्या समोर उघडण्यात येऊन सर्व निविदा धारकासोबत वाटाघाटी करण्यात आल्या. वाटाघाटी नंतरच्या दराचा तुलानात्मक तक्ता सोबत अवलोकनार्थ जोडला आहे. त्यानुसार एकूण चार पुरवठाधारकाची निवड करण्यात येवून पुरवठा करण्यात येणा-या भोजनाचा दर्जा तपासण्यासाठी मा कुलगुरूमहोदयांनी सुचविलेल्या समितीच्या शिफारशीनुसार मे जुगल महाराज केटरर्स सोलापूर याना सर्वात कमी दराची (रू.५४/- प्रति व्यक्ती प्रति दिवसा प्रमाणे) निविदा मान्य करण्याची शिफारस करण्यात आली. भोजन पुरवठयाकरीता एकूण रू.६,४८,०००/-इतका खर्च अपेक्षित असल्याने मे. जुगल महाराज केटरर्स यांना भोजनाचा पुरवठा आदेश देण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव :** **सोलापूर विद्यापीठातर्फे आयोजित आव्हान २०११ या कार्यक्रमात सहभागी होणा-या अंदाजे १२०० स्वयंसेवक/स्वयसेविका/संघव्यवस्थापक व इतर मान्यवरांना भोजन पुरवठा करण्याबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी गठीत केलेल्या समितीची शिफारस स्विकारण्यात येवून मे. जुगल महाराज केटरर्स, सोलापूर यांची सर्वात कमी दराने (रु.५४/- प्रति व्यक्ती प्रति दिवसाप्रमाणे) निविदा मान्य करण्यात येवून त्यांना भोजनाचा पुरवठा आदेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

**[१७ (४)] सिंहगड इन्स्टिटयूट ऑफ फार्म्यास्यूटिकल सायन्सेस (SIPS) व सोलापूर विद्यापीठ यांच्यामध्ये अॅकेडेमिक व रिसर्च कोलॅबरेशनसंदर्भात सामंजस्य करार करण्याबाबत प्रा. डॉ. लोणीकर यांचे पत्र विचारार्थ.**

(टिपणीः सिंहगड इन्स्टिटयूट ऑफ फार्म्यास्यूटिकल सायन्सेस (SIPS) यांच्याकडे संशोधनाकरीता आवश्यक सुविधा व तज्ञ शिक्षकवर्ग उपलब्ध असल्याने त्यांनी सोलापूर विद्यापीठासमवेत मेडिकल केमिस्ट्री, फार्माकॉलॉजी व टॉक्सिकॉलॉजी व फायटोकेमिस्ट्री या विषयातील महत्वाच्या संशोधनाकरीता सामंजस्य करार करण्याची उत्सुकता दर्शविली असून याबाबतचा सामंजस्य कराराचा मसूदा व त्याबाबतचे प्रा. डॉ. लोणीकर यांनी दिलेले पत्र सोबत जोडले आहे.
सबब, सिंहगड इन्स्टिटयूट ऑफ फार्म्यास्यूटिकल सायन्सेस (SIPS) यांच्यासमवेत अॅकेडेमिक रिसर्च करण्याबाबत सामंजस्य करार करण्याची बाब विचारार्थ).

ठराव : **सिंहगड इन्स्टिटयूट ऑफ फार्म्यास्यूटिकल सायन्सेस (SIPS) व सोलापूर विद्यापीठ यांच्यामध्ये अॅकेडेमिक व रिसर्च कोलॅबरेशनसंदर्भात सामंजस्य करार करण्यास मान्यता देण्यात आली.**

**[१७ (५)] किलोमीटर भत्यातील दरामध्ये शासनाने केलेल्या वाढीबाबत प्राचार्य डॉ. गणगे के. एन. यांचे पत्र विचारार्थ.**

(टिपणी: वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. प्रवास-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, दि.०३ मार्च, २०१० मधील तरतूदीनुसार, पेट्रोल प्रति कि.मी. रु.९/- व डिझेल प्रति कि.मी. रु.७/- इतके दर सुधारीत करण्यात आले आहेत. सदरचे सुधारीत दर विद्यापीठास लागू करण्याबाबत प्राचार्य डॉ. गणगे के. एन. यांचे पत्र सोबत जोडले आहे.
सबब, प्राचार्य डॉ. गणगे के. एन. यांचे किलोमीटर भत्त्यातील दरामध्ये शासनाने केलेल्या वाढीबाबतचे पत्र विचारार्थ).

**ठराव :**

**१) किलोमीटर भत्त्यातील दरामध्ये शासनाने दि.०३ मार्च, २०१० रोजीच्या शासन निर्णयान्वये वाढ केलेली आहे. सदरची वाढ खालीलप्रमाणे मान्य करण्यात आली.**

| अ.क्र. | पेट्रोल (प्रति कि.मी. दर) | डिझेल (प्रति कि.मी. दर) |
|---|---|---|
| १) | रु.७/- | रु.५/- |

**२) विद्यापीठ सुरक्षा गेटवर वाहनांसाठी पासची व्यवस्था करावी. व्यवस्थापन परिषद सदस्य वगळता इतर सर्व सदस्यांना वरीलप्रमाणे वाहनाचे देयक आदा करताना विद्यापीठाचा गेटपास आवश्यक राहील.**

**३) व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांना व्यवस्थापन परिषदेची बैठक व व्यवस्थापन परिषद सदस्य या पदाने इतर कोणत्याही बैठकांना अध्यक्ष / सदस्य म्हणून हजर राहणे गरजेचे असेल तेव्हाच त्यांना कार प्रवासासाठी मा.कुलगुरुंची पूर्वमान्यता घेण्याची गरज नाही. इतर सर्व बैठकांना त्या त्या सदस्यांप्रमाणे कार प्रवासाचे नियम लागू राहतील.**

**४) वरीलप्रमाणे योग्य ते बदल अध्यादेशात करावेत.**

**अभिनंदनाचे ठराव :**

१) मा.कुलगुरु यांना महाराष्ट्र वृक्ष संवर्धिनीतर्फे **आदर्श समाजभूषण पुरस्कार २०११** जाहीर झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.

२) राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक श्री. तुकाराम शिंदे यांना महाराष्ट्र वृक्ष संवर्धिनीतर्फे **आदर्श वृक्षसंगोपन पुरस्कार २०११** जाहीर झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करण्यात आला.

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने सभा संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सही/-**
**कॅप्टन डॉ. नि. पां. सोनजे**
**सचिव, व्यवस्थापन परिषद**

**सही/-**
**डॉ. बा. पां. बंडगर**
**अध्यक्ष, व्यवस्थापन परिषद**